मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार मा. न्यायालयात रक्कम जमा करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

मदत व पुनर्वसन विभाग,

शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०२६/प्र.क्र. ३३०/मदत-१ (म-३)

नवीन प्रशासन भवन, १४ वा मजला, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक: २१ ऑगस्ट, २०२६

<u>संदर्भ:-</u>

१) विभागीय आयुक्त, कोकण यांचे पत्र क्र. भूस/कार्या-१/सक-१/रिट या. ९३८५-२६/ई ३३५७९१४ गौरीपाडा भिवंडी/२०२६, दि. २९.०७.२०२६

२) जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र. उजि/भूस (समन्वय)/टे-१/कावि १४६८/२०२६/जा. क्र. ११८७, दि. २९.०७.२०२६

<u>प्रस्तावना :-</u>

मौजे गौरीपाडा, ता. भिवंडी येथील स.नं. २६ (क्षेत्र ३७०० चौ. मी.) व स.नं. ६०/१ (क्षेत्र १६०० चो.मी.) अशा एकूण ५३०० चौ. मीः जमिनीचे भूसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये सन १९८४ च्या दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादीत केलेल्या क्षेत्राबाबत, लक्ष्मण टावरे यांनी मा. दिवाणी न्यायालय भिवंडी येथे दरखास्त क्र. १/२०२४ अन्वये दावा दाखल केला होता. त्यामध्ये मा. दिवाणी न्यायालय, भिवंडी यांनी, दि. ०८/०५/२०२६ व दि. २४/०७/२०२६ रोजी पारित केलेल्या आदेशा विरूध्द, उपविभागीय अधिकारी भिवंडी कार्यालयाने, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटिशन क्र. ९३८५/२०२६ दाखल करण्यात आले आहे. त्यामध्ये दि. २७/०७/२०२६ रोजीच्या आदेशामध्ये भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम २३(१) प्रमाणे नगररचना मुल्य निर्धारण विभाग ठाणे यांनी दि. १३/०२/२०२५ रोजी व्याजाची परिगणना करुन त्यानुसार रक्कम रुपये ९१,६६,२४६/- (अक्षरी रक्कम ऐक्याण्णव लाख सहासष्ठ हजार दोनशे सेहचाळीस मात्र) इतकी निश्चित केल्याप्रमाणे सदरची रक्कम रुपये ९१,६६,२४६/- ऐवढी तीन आठवडयात लगतच्या (Executing Court) न्यायालयात जमा करणेबाबत आदेश पारीत केलेल्या आदेशास अनुसरून सदरची रक्कम तीन आठवडयाच्या आत, मा. न्यायालयात जमा करावयाची असल्याने रक्कम रू.९१,६६,२४६/- सदंर्भ क्र. १ व २ अन्वये शासनाकडून रक्कम उपलब्ध करून देण्यावावत विनंती करण्यात आली आहे. तथापि, २२३५ या मुख्य लेखाशिर्षा मध्ये

बाबींसाठी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करून देण्यासाठी अन्य कोणत्याही उपशिर्षामध्ये आवश्यक तेवढी तरतूद नसल्याने, सदर लेखाशिर्षामधून उणे प्राधिकाराद्वारे तरतूद आहरीत करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी, ठाणे यांना प्राधिकृत करण्याची बाव विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मौजे गौरीपाडा, ता. भिवंडी येथील स.नं. २६ (क्षेत्र ३७०० चौ.मी.) व स.नं. ६०/१ (क्षेत्र १६०० चो.मी.) अशा एकूण ५३०० चौ. मीः जमिनीचे भूसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये सन १९८४ च्या दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादीत केलेल्या क्षेत्राबाबत, श्री. लक्ष्मण टावरे यांच्या वारसांनी मा. दिवाणी न्यायालय भिवंडी येथे दरखास्त क्र. १/२०२४ अन्वये दावा दाखल केला होता. त्यामध्ये मा. दिवाणी न्यायालय, भिवंडी यांनी दि. ०८/०५/२०२६ व दि. २४/०७/२०२६ रोजी पारित केलेल्या आदेशा विरूध्द, उपविभागीय अधिकारी भिवंडी कार्यालयाने, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटिशन क्र. ९३८५/२०२६ दाखल करण्यात आले आहे. सदर रिट याचिकेमध्ये दि. २७/०७/२०२६ रोजीच्या आदेशानुसार रुपये ९१,६६,२४६/- (अक्षरी रक्कम ऐक्याण्णव लाख सहासष्ठ हजार दोनशे सेहचाळीस मात्र) इतकी रक्कम मा. न्यायालयात जमा करण्याकरिता विभागीय आयुक्त, कोकण व जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सादर केलेला प्रस्ताव विचारात घेता, सदर प्रकरणी रू.९१,६६,२४६/- (अक्षरी रक्कम ऐक्याण्णव लाख सहासष्ठ हजार दोनशे सेहचाळीस मात्र) इतकी रक्कम मा. उच्च न्यायालयात जमा करण्यासाठी या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी संबंधित जिल्हाधिकारी व संबंधित उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांनी खालील अटींची पूर्तता त्वरीत करण्याबाबत दक्षता घ्यावी.

अ) सदर प्रकरणी मा उच्च न्यायालयाने दिनांक २७.०७.२०२६ रोजी आदेश दिले आहेत, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

ब) त्यानंतर सदरहू मंजूर झालेली रक्कम तातडीने मा. उच्च न्यायालयात भरणा करावी व रक्कम मा. उच्च न्यायालयात जमा केल्याबाबतची पावतीची प्रमाणित प्रत शासनास त्वरीत सादर करावी.

क) सदरचे भूसंदर्भ प्रकरणात रक्कम संबंधितांना अदा करण्याबाबत मा.वरिष्ठ न्यायालयाकडून स्थगिती आदेश प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने कसोशीने कार्यवाही करावी.

ड) सदर न्यायालयीन प्रकरणी मा.वरिष्ठ न्यायालयाच्या अंतिम निर्णयाप्रमाणे वरील रकमेच्या प्रदानाबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी. परंतु अंतिम निर्णयापूर्वी न्यायालयाने अंतरीम निदेशाद्वारे प्रतिवादीस (संबंधित व्यक्ती) रक्कम देण्याचे निर्देश दिल्यास, राष्ट्रीयीकृत बँकेकडून न्यायालयाच्या अंतिम निर्णयापर्यंत अंमलात राहणाऱ्या हमीपत्राच्या आधारे संबंधितांना रक्कम प्रदान करावी, अशी लेखी विनंती सरकारी वकीलांमार्फत मा.न्यायालयास करण्यात यावी.

इ) सदर न्यायालयीन प्रकरणात मा.वरिष्ठ न्यायालयाचा अंतिम निर्णय लागल्याशिवाय किंवा वरिष्ठ न्यायालयाच्या निर्देशाशिवाय तसेच राष्ट्रीयीकृत बँकेच्या हमीशिवाय (राष्ट्रीयीकृत बँकेची हमी मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयापर्यंत Valid असणे आवश्यक राहील) संबंधितांना रक्कम वितरीत करु नये, अशी लेखी विनंती सरकारी वकीलांमार्फत मा.न्यायालयास करण्यात यावी.

फ) सदर प्रकरणी कोणत्याही खातेदारास उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी व मा.न्यायालयामार्फत कोणत्याही बाबतीत दुहेरी फायदा होणार नाही याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी व उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी घ्यावी.

म) सदर प्रकरणी लेखाशीर्ष- **"८६७४-शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी"** अंतर्गत येणाऱ्या न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या न्यायनिर्णयाची, हुकुमनाम्याची किंवा निवाडयाची पूर्ती करण्याबाबत वित्त विभागाने दि.१२.०८.२०१४ व दि. ३.६.२०१५ रोजी परिपत्रके निर्गमित केली आहेत. त्यानुसार तसेच अशा प्रकरणी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रक/ शासन निर्णयान्वये दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करावी.

३. **याबाबतीत होणारा खर्च हा "८६७४-शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी-१०१, शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी- (अ) न्यायालयाकडे जमा केलेल्या प्रतिभूती रकमा (संगणक संकेतांक-८६७४-००१९)" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.**

४. वर उल्लेखिलेल्या लेखाशिर्षाखाली देण्यात आलेली मंजूरी ही अंतिम असून मंजूर केलेल्या रकमेचा भरणा मा.न्यायालयात केल्यावर मदत व पुनर्वसन विभाग, मागणी क्र.सी-५, मुख्य लेखाशीर्ष-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, २००- इतर कार्यक्रम, (०१) दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्या व्यक्तींना सहाय्य (०१) (०१) दंगलग्रस्त भागातील झळ पोहचलेल्या व्यक्तींना सहाय्य ३१, सहाय्यक अनुदाने (२२३५ २९३१) (भारित) (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली या खर्चाची जुळवणी करावी लागेल.

जर मा.वरिष्ठ न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या अपिलाचा अंतिम निकाल शासनाच्या बाजूने लागला तर या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम मा.न्यायालयातून काढून त्या रकमेचा भरणा "८६७४-शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी-१०१, शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी- (अ) न्यायालयाकडे जमा केलेल्या प्रतिभूती रकमा (संगणक संकेतांक-८६७४-५०१२)" या लेखाशिर्षाखाली करावा लागेल.

५. जर मा.वरिष्ठ न्यायालयाचा निकाल शासनाच्या विरुध्द बाजूने लागला तर सदरहू रक्कम "८६७४-शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी-१०१, शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी- (अ) न्यायालयाकडे जमा केलेल्या प्रतिभूती ठेवी (संगणक संकेतांक-८६७४-५०१२) या जमा लेखाशिर्षाखाली जमा दर्शवून मागणी क्र.सी-५, मुख्य लेखाशीर्ष-२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, २००- इतर कार्यक्रम, (०१) दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्या व्यक्तींना सहाय्य (०१) (०१) दंगलग्रस्त भागातील झळ

पोहचलेल्या व्यक्तींना सहाय्य ३१, सहाय्यक अनुदाने (२२३५ २९३१) (भारित) (वेतनेतर) या अंतिम लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा लागेल व त्या परिस्थितीत संबंधित अधिकारी आवश्यक त्या "**भारित**" रकमेच्या मंजूरीबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करतील.

६. या प्रकरणी वाढीव मोबदला व व्याजाची परिगणना योग्य असल्याची खात्री करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

७. कोणत्याही परिस्थित्तीत मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही, याची दक्षता नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी. तसेच, खर्चाचा मेळ महालेखापाल यांनी नोंदविलेल्या खर्चाशी घेण्यात यावा व महालेखापालाच्या ताळमेळ प्रमाणपत्रासह विनियोजन लेखे शासनाकडे तात्काळ पाठवावे.

८. सदर प्रकरणी होणाऱ्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत न चुकता शासनास प्राप्त होईल, याची दक्षता विभागीय आयुक्त, कोकण यांनी घ्यावी.

९. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४७८/२०२६/व्यय-९, दिनांक १९.०८.२०२६ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८२११४५०३२४७४१ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SUNIL SAHADEV SAMANT

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=A4A500C119248A09FE5D0D36BC9F0BA6293DBE4D8627A5DD6564AB553EB423BE, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9DD55AE986CA91D28E660B50413EC5EAF6927164EA00F1B88EB0DCF5034D9B7F, cn=SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.08.21 14:51:34 +05'30'

(सुनिल स. सामंत)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग

२) जिल्हाधिकारी, ठाणे

३) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर

४) महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर

५) संचालक लेखा व कोषागरे, संगणक शाखा, मुंबई,

६) सह सचिव तथा वित्तीय सल्लागार, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे

८) वित्त विभाग (व्यय-९/अर्थसंकल्प-६/अर्थसंकल्प-२), मंत्रालय, मुंबई

९) कक्ष अधिकारी, मदत-३, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०) निवडनस्ती (मदत-१ (म-३) कार्यासन)